INTERNATIONAL RESEARCH JOURNAL OF HUMANITIES AND INTERDISCIPLINARY STUDIES
( Peer-reviewed, Refereed, Indexed & Open Access Journal )
DOI : 03.2021-11278686 ISSN : 2582-8568 IMPACT FACTOR : 8.428 (SJIF 2026)

# "दीनमित्रमधील धर्मविषयक लेखन साहित्य : एक अभ्यास"

## (Religious Writings in Dinamitra : A Study)

**संदिप हरिभाऊ शिरसाठ**
संशोधक विद्यार्थी,
इतिहास विभाग व संशोधन केंद्र,
न्यू आर्ट्स, कॉमर्स & सायन्स कॉलेज [स्वायत्त]
लालटाकी रोड, अहिल्यानगर,
विद्यापीठ: सावित्रीबाई फुले पुणे विद्यापीठ,
पुणे (महाराष्ट्र, भारत)

**डॉ. नारायण कारभारी म्हस्के**
संशोधक मार्गदर्शक,
इतिहास विभाग प्रमुख,
जिजामाता शास्त्र व कला महाविद्यालय,
ज्ञानेश्वरनगर, भेंडे बु. ता. नेवासा,
जि. अहिल्यानगर (महाराष्ट्र, भारत)

E-mail:shirsathsandip29@gmail.com
**DOI No. 03.2021-11278686 DOI Link :: https://doi-ds.org/doilink/09.2026-61524128/IRJHIS2609012**

***सारांश (Abstract):***

*'दीनमित्रमधील धर्मविषयक लेखन साहित्याचा चिकित्सक अभ्यास' या संशोधनात 'दीनमित्र'च्या १८८८–१८९२ आणि १९१०–१९६७ या कालखंडातील धर्मविषयक साहित्याचा चिकित्सक अभ्यास करण्यात आला आहे. गणपतराव पाटील यांच्या प्रारंभिक संपादकीय कार्यापासून मुकुंदराव पाटील यांनी १९१० मध्ये केलेल्या पुनरुज्जीवनानंतर 'दीनमित्र' मधून धर्मविषयक चिंतनाला व्यापक अभिव्यक्ती मिळाली.*

*या अभ्यासात अग्रलेख, संकीर्ण लेख, कादंबरी, कथा, सदरे, कविता, अभंग, लावणी, पोवाडे, पत्रव्यवहार आणि खंडकाव्य या साहित्यप्रकारांचा विचार करण्यात आला आहे. या माध्यमांतून अंधश्रद्धा, कर्मकांड, धार्मिक दांभिकता, पुरोहितशाही, जातिभेद, धार्मिक शोषण आणि सामाजिक विषमता यांसारख्या प्रश्नांची चिकित्सा करण्यात आली. त्याचबरोबर शिक्षण, विवेक, वैज्ञानिक दृष्टिकोन, समता, नैतिकता आणि सामाजिक जागृती हे उपाय सुचविण्यात आले.*

*अभ्यासातून स्पष्ट होते की 'दीनमित्र'मधील धर्मविषयक लेखन हे धर्मविरोधी नसून अविवेकी व शोषणकारी धार्मिक प्रवृत्तींची चिकित्सा करणारे परिवर्तनवादी आणि मानवतावादी चिंतन आहे. त्यामुळे 'दीनमित्र' हे धर्मचिकित्सा, सामाजिक प्रबोधन आणि वैचारिक परिवर्तनाचे प्रभावी माध्यम ठरले.*

***महत्वाचे शब्द (Keywords)***- *धर्मविषयक अग्रलेख, कथा आणि कादंबरी, सदरे दीनमित्र, धर्मविषयक साहित्य, धर्मचिकित्सा, सत्यशोधक विचारसरणी, सामाजिक प्रबोधन, विवेकवाद, अंधश्रद्धा, जातिभेद ,पोवाडे, लावणी, अभंग*

### १. प्रस्तावना (Introduction) -

एकोणिसाव्या शतकाच्या उत्तरार्धात महाराष्ट्राच्या सामाजिक, धार्मिक आणि वैचारिक जीवनात परिवर्तनाची प्रक्रिया

गतिमान झाली. आधुनिक शिक्षणाचा प्रसार, मुद्रणसंस्कृतीचा विकास, पाश्चात्त्य विचारांचा प्रभाव आणि विविध समाजसुधारक चळवळी यांमुळे तत्कालीन समाजातील धार्मिक रूढी, कर्मकांड, अंधश्रद्धा, जातिभेद, पुरोहितशाही आणि सामाजिक विषमता यांविषयी प्रश्न उपस्थित होऊ लागले. महात्मा ज्योतिराव फुले यांच्या सत्यशोधक विचारसरणीने या वैचारिक परिवर्तनाला महत्त्वपूर्ण दिशा दिली. या काळात वृत्तपत्रे आणि नियतकालिके ही केवळ बातम्यांचे माध्यम न राहता सामाजिक प्रबोधन आणि वैचारिक जागृतीची प्रभावी साधने बनली. या संदर्भात 'दीनमित्र' या वृत्तपत्राचे योगदान उल्लेखनीय ठरते.

'दीनमित्र'च्या प्रारंभिक वाटचालीत गणपतराव पाटील यांचा १८८८–१८९२ हा कालखंड महत्त्वाचा आहे. पुढे काही काळाच्या खंडानंतर मुकुंदराव पाटील यांनी १९१० मध्ये 'दीनमित्र'चे पुनरुज्जीवन केले. त्यानंतर १९१० ते १९६७ या दीर्घ कालखंडात 'दीनमित्र'ने सामाजिक, धार्मिक, सांस्कृतिक आणि वैचारिक विषयांना सातत्याने स्थान दिले. त्यामुळे 'दीनमित्र'चा अभ्यास हा तत्कालीन महाराष्ट्रातील सामाजिक व धार्मिक जीवनातील बदल समजून घेण्यासाठी महत्त्वाचा ठरतो.

प्रस्तुत अभ्यासाचा विषय 'दीनमित्रमधील धर्मविषयक लेखन साहित्य : एक स्वरूपात्मक अभ्यास' हा आहे. 'दीनमित्र'मधील धर्मविषयक साहित्य हे केवळ स्वतंत्र धार्मिक लेखांपुरते मर्यादित नसून विविध गद्य आणि पद्य साहित्यप्रकारांतून व्यक्त झालेले दिसते. अग्रलेख, संकीर्ण लेख, कादंबरी, कथा, सदरे, कविता, अभंग, लावणी, पोवाडे, पत्रव्यवहार आणि खंडकाव्य या विविध साहित्यप्रकारांमध्ये धर्मविषयक विषयांना अभिव्यक्ती मिळालेली आहे.

या साहित्यामध्ये तत्कालीन समाजातील धार्मिक रूढी, श्रद्धा-अंधश्रद्धा, कर्मकांड, धार्मिक आचार-विचार, सामाजिक विषमता आणि धर्माशी संबंधित विविध प्रश्नांचे प्रतिबिंब आढळते. अग्रलेख व संकीर्ण लेखांमधून समकालीन धार्मिक विषयांवर विचार व्यक्त झाले, तर कथा, कादंबरी आणि सदरलेखनातून धार्मिक विषयांना सामाजिक व मानवी जीवनाची पार्श्वभूमी प्राप्त झाली. कविता, अभंग, लावणी आणि पोवाडे या लोकाभिमुख साहित्यप्रकारांतून धर्मविषयक विचारांची अभिव्यक्ती अधिक प्रभावीपणे झालेली दिसते. पत्रव्यवहारातून वाचकांच्या धार्मिक विषयांशी संबंधित शंका, अनुभव आणि मते व्यक्त झाली.

त्यामुळे 'दीनमित्र'मधील धर्मविषयक साहित्याचा अभ्यास करताना त्याचे साहित्यप्रकार, विषयवैविध्य, आशयसूत्रे, अभिव्यक्तीचे स्वरूप आणि कालानुरूप झालेला विकास समजून घेणे आवश्यक ठरते. प्रस्तुत अभ्यासात 'दीनमित्र'च्या १८८८–१८९२ आणि १९१०–१९६७ या कालखंडातील उपलब्ध साहित्याच्या आधारे धर्मविषयक लेखनाचे स्वरूप आणि त्याची विविध साहित्यप्रकारांतील अभिव्यक्ती यांचा आढावा घेण्यात येणार आहे. या माध्यमातून 'दीनमित्र'च्या धर्मविषयक लेखन साहित्याची ओळख, व्याप्ती आणि स्वरूप स्पष्ट करण्याचा प्रयत्न करण्यात आला आहे

**२. संशोधन उद्दिष्टे (Objectives):**

प्रस्तुत संशोधनाची प्रमुख उद्दिष्टे पुढीलप्रमाणे आहेत :

1 'दीनमित्र'मधील धर्मविषयक लेखनाची ओळख करून देणे.

2. 'दीनमित्र'मधील धर्मविषयक लेखन साहित्याची व्याप्ती आणि स्वरूप स्पष्ट करणे.

3. अग्रलेख, संकीर्ण लेख, कादंबरी, कथा, सदरे, कविता, अभंग, लावणी, पोवाडे, पत्रव्यवहार आणि खंडकाव्य या विविध

साहित्य प्रकारांमधील धर्मविषयक लेखनाचा आढावा घेणे.

4. ‘दीनमित्र’मधील धर्मविषयक लेखनातील प्रमुख विषय व आशयसूत्रे निश्चित करणे.

5. ‘दीनमित्र’मधील विविध साहित्यप्रकारांतून धर्मविषयक लेखनाची झालेली अभिव्यक्ती व विकास स्पष्ट करणे.

**३. संशोधनाची गृहितके-**

1. दीनमित्र’मध्ये धर्मविषयक लेखनाला महत्त्वपूर्ण स्थान प्राप्त झालेले आहे.

2. ‘दीनमित्र’मधील धर्मविषयक लेखन हे केवळ स्वतंत्र लेखांपुरते मर्यादित नसून विविध गद्य व पद्य साहित्यप्रकारांतून व्यक्त झालेले आहे.

3. अग्रलेख, संकीर्ण लेख, कादंबरी, कथा, सदरे, कविता, अभंग, लावणी, पोवाडे, पत्रव्यवहार आणि खंडकाव्य या विविध साहित्यप्रकारांतून धर्मविषयक विषयांची अभिव्यक्ती झालेली आहे.

4. ‘दीनमित्र’मधील धर्मविषयक लेखनात तत्कालीन समाजजीवनाशी संबंधित विविध धार्मिक विषय व प्रश्न प्रतिबिंबित झालेले आहेत

5. ‘दीनमित्र’च्या विविध कालखंडांत धर्मविषयक लेखनाच्या स्वरूपात आणि अभिव्यक्तीच्या पद्धतीत विकास झालेला दिसून येतो.

**४. संशोधन पद्धती (Methodology)-**

या संशोधनात खालील पद्धतींचा वापर करण्यात आला आहे:

संशोधनासाठी ऐतिहासिक व वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा प्रामुख्याने वापर करण्यात आला आहे. ‘दीनमित्र’च्या उपलब्ध अंकांमधील धर्मविषयक साहित्य हे या अभ्यासाचे प्रमुख प्राथमिक साधन आहे. या साहित्याचे अग्रलेख, संकीर्ण लेख, कादंबरी, कथा, सदरे, कविता, अभंग, लावणी, पोवाडे, पत्रव्यवहार आणि खंडकाव्य अशा विविध साहित्यप्रकारांनुसार वर्गीकरण करून त्यांचे स्वरूप व आशयसूत्रे स्पष्ट करण्यात आली आहेत. तसेच ‘दीनमित्र’च्या १८८८–१८९२ आणि १९१०–१९६७ या कालखंडांचा ऐतिहासिक संदर्भ विचारात घेण्यात आला आहे. प्रस्तुत अभ्यासाचा भर धर्मविषयक लेखनाची ओळख, व्याप्ती, स्वरूप आणि विविध साहित्यप्रकारांतील अभिव्यक्ती स्पष्ट करण्यावर असून

**५. दीनमित्र स्थापना व इतिहास-**

१९ व्या शतकामध्ये महाराष्ट्राच्या प्रबोधन चळवळीतील या कालखंडातील एक वैशिष्टचपूर्ण व इतर सर्वसाधारण पत्रांपेक्षा सर्वस्वी निराळे पत्र म्हणून ग्रामीण भागात सत्यशोधक विचाराचे वृतपत्र म्हणून 'दीनमित्र'चा उल्लेख केला पाहिजे. सत्यशोधक कृष्णराव भालेकरांच्याच प्रेरणेने गणपतराव पाटील यांनी १८८८ साली' दीनमित्र' नावाचे मासिक सुरू केले. पुढे काही दिवस साप्ताहिक म्हणूनही ते चालविले. पण ते न जमल्यामुळे पुन्हा मासिकात त्याचे रूपांतर करण्यात आले.' दीनमित्रा 'च्या प्रत्येक अंकात लेखाशी संबंधित असे चित्रही देण्यात येत असे. " अनेक कररूपी जळवा लागल्या आहेत असा शेतकरी ! शेतकऱ्याच्या घरात कर्जाचे उंटाचे पिलू शिरले आणि त्याने मग शेतकऱ्याचे घर पाडले असे शेत करी कुटुंब ! शेतकऱ्यांच्या मानगुटीवर ग्रामाधिकारी,

त्यांच्या मानेवर सरकारी अधि-कारी असा भारावलेला शेतकरी वगैरे चित्रे" या मासिकात प्रसिद्ध झाली होती. परंतु ८ ऑक्टोबर १८९२ रोजी वयाच्या अवध्या २७ व्या वर्षी गणपतरावांचे निधन झाले व मासिक बंद पडले. पाटील यांचे निधन झाल्यावर, भालेकरांनी आपल्या मुलाला पाटलांच्या विधवेच्या म्हणजे आपल्या बहिणीच्या मांडीवर दत्तक दिले. हा मुलगा म्हणजेच 'दीनमित्र 'कार मुकुंदराव गणपतराव पाटील हे होत.' सत्यशोधक मुकुंदराव पाटील यांनी दि. २३ नोव्हेंबर १९१० रोजी दीनमित्र या साप्ताहिकाचे पुनरुजीवन केले. प्रथम सोमठाणे नंतर तरवडी, जि. अहमदनगर या ५०० ते ६०० लोकवस्तीच्या ग्रामीण भागातून एकूण ५७ वर्षे या साप्ताहिक वृत्तपत्राचा अखंडपणे प्रवास सत्यशोधक विचारतत्त्वांनी झाला. या वृत्तपत्रामध्ये वैद्य मुरलीधर आबाजी क्षीरसागर (नातेपुते), जयराम नाना वैद्य, भीमराव जातोराव बनसोडे, बाबुराव सदाशिव मेहेत्रे, हरिभाऊ लक्ष्मण चव्हाण, महंत गोविंद महानुभाव, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यासारख्या सत्यशोधक विचारांच्या व्यक्तींनचे दीनमित्र मध्ये संकीर्ण लेख प्रकाशित झाले. कथा, लेख, कविता, संवाद, अग्रलेख, दीनमित्रमधील धर्मविषयक कविता - श्रीखंड, लावणी, पोवाडे, अभंग, स्पुट कविता संकीर्ण लेख, दीनमित्र'मधील पत्रव्यवहार या साहित्यप्रकारातून लेखन करत बहुजन समाजाच्या उद्धारासाठी प्रबोधन केले.

**६. दीनमित्रमधील धर्मविषयक लेखन साहित्यचे स्वरूप-**

**६.१. अग्रलेख-**

दीनमित्र हे सत्यशोधक चळवळीचे प्रभावी विचारमंच होते. या पत्रातील अग्रलेख हे केवळ संपादकीय लेख नसून बहुजन समाजाच्या सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक आणि आर्थिक प्रश्नांचे चिकित्सक विश्लेषण करणारे वैचारिक दस्तऐवज होते. त्यामुळे दीनमित्रच्या इतिहासाचा अभ्यास करताना अग्रलेखांना विशेष महत्त्व प्राप्त होते. कृष्णराव पांडुरंग भालेकर यांनी १८७७ मध्ये दीनबंधू या पहिल्या सत्यशोधक वृत्तपत्राची सुरुवात करून सत्यशोधक पत्रकारितेची पायाभरणी केली. त्यानंतर १८८८ मध्ये दीनमित्र मासिकाची स्थापना झाली. गणपतराव पाटील यांच्या निधनाने त्याचे प्रकाशन काही काळ खंडित झाले.परंतु भालेकरांच्या इच्छेनुसार मुकुंदराव गणपतराव पाटील यांनी २३ नोव्हेंबर १९१० रोजी सोमठाणे येथून दीनमित्रचे पुनरुज्जीवन केले. त्यानंतर जवळपास ५७ वर्षे हे पत्र सातत्याने प्रकाशित होत राहिले. ग्रामीण भागातून इतक्या प्रदीर्घ काळ चाललेले हे सत्यशोधक वृत्तपत्र मराठी पत्रकारितेच्या इतिहासात वैशिष्ट्यपूर्ण ठरते.

दीनमित्रच्या अग्रलेखांचे मुख्य वैशिष्ट्य म्हणजे ते सामान्य जनतेच्या जीवनाशी जोडलेले होते. त्या काळातील बहुजन समाज अज्ञान, दारिद्र्य, जातिभेद, अंधश्रद्धा, कर्जबाजारीपणा आणि शिक्षणाच्या अभावामुळे अनेक समस्यांना सामोरे जात होता. या सर्व प्रश्नांचा वस्तुनिष्ठ आणि चिकित्सक विचार अग्रलेखांमधून करण्यात आला. विशेषतः शेतकरी, कारागीर, मजूर आणि ग्रामीण समाज यांच्या अडचणींना अग्रक्रम देण्यात आला.

२३ नोव्हेंबर १९१० च्या पहिल्या अग्रलेखातच मुकुंदराव पाटील यांनी दीनमित्रचे उद्दिष्ट स्पष्ट केले. त्यांनी शेतकरी आणि कारागीर यांच्या धार्मिक, सामाजिक आणि शैक्षणिक उन्नतीसाठी हे पत्र कार्य करणार असल्याचे सांगितले. समाजाची प्रगती ही शिक्षण, स्वाभिमान आणि विवेक यांच्या आधारावरच शक्य आहे, ही भूमिका त्यांनी सातत्याने मांडली. अग्रलेखांमध्ये धर्माचाही चिकित्सक विचार आढळतो. धर्माच्या नावाखाली चालणारे कर्मकांड, अंधश्रद्धा, जातिभेद आणि पुरोहितशाही यांवर त्यांनी कठोर

टीका केली. मात्र ही टीका धर्मावर नसून धर्माच्या नावाखाली होणाऱ्या सामाजिक शोषणावर होती. खरा धर्म म्हणजे सत्य, समता, मानवता आणि नैतिक आचरण, अशी भूमिका या लेखांतून स्पष्टपणे मांडण्यात आली आहे.

दीनमित्रचे दुसरे संपादक मुकुंदराव पाटील यांनी जवळपास २२०० अग्रलेख स्वतः लिहिल्याचे नमूद केले जाते. त्यांच्या लेखनात स्पष्ट विचार, तर्कशुद्ध मांडणी आणि समाजपरिवर्तनाची तीव्र तळमळ दिसून येते. हरिश्चंद्र नवलकर, जयराम नाना वैद्य आणि अण्णासाहेब दिवाण बहादुर लठ्ठे यांसारख्या सत्यशोधक विचारवंतांनीही सामाजिक आणि धार्मिक विषयांवर अग्रलेख लिहून या परंपरेला बळ दिले. या अग्रलेखांमधून दीनमित्रने केवळ बातम्या दिल्या नाहीत, तर बहुजन समाजाला विचारांची दिशा दिली. सत्यशोधक चळवळीची उद्दिष्टे, सामाजिक समता, विवेकवाद, शिक्षणाचा प्रसार आणि धार्मिक सुधारणांची आवश्यकता यांचा सातत्याने प्रचार करण्यात आला.

**६.२ दीनमित्र मधील संकीर्ण लेखन-**

या साप्ताहिक वृत्तपत्राचा अखंडपणे प्रवास सत्यशोधक विचारतत्त्वांनी झाला. या वृत्तपत्रामध्ये वैद्य मुरलीधर आबाजी क्षीरसागर (नातेपुते), जयराम नाना वैद्य, भीमराव जातोराव बनसोडे, बाबुराव सदाशिव मेहेत्रे, हरिभाऊ लक्ष्मण चव्हाण, महंत गोविंद महानुभाव, तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी यासारख्या सत्यशोधक विचारांच्या व्यक्तींनचे दीनमित्र मध्ये संकीर्ण लेख प्रकाशित झाले. उदा.यात तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी हे मराठीतील प्रख्यात तत्त्वज्ञ, धर्मचिंतक आणि समाजसुधारक होते. त्यांचे "दीनमित्र" या सत्यशोधकीय वृत्तपत्रामध्ये दि०९ मे १९३४ च्या अंकात "शास्त्र स्वच्छ करा" हा लेख त्यांचा प्रकाशित झाला. तर्कतीर्थ लक्ष्मण शास्त्री जोशी यांचे सत्यशोधक विचार हालेख २४ फेब्रुवारी १९३७ रोजी प्रकाशित झाला तर लक्ष्मी-देवदास हा लेख १९ जुलै १९३३ रोजी प्रकाशित झाला तर या लेखामधून त्यांनी धर्म, समाज आणि नैतिकतेवर चिकित्सक विचार मांडले आहेत.

**६.३ धर्मविषयक कथा व कादंबरी-**

**६.३.१ कथा-**

इ स १९२१ ते १९४४ या कालखंडात 'दीनमित्र' या साप्ताहिकातून मुकुंदराव पाटील यांच्या सुमारे ३८ कथा प्रसिद्ध झाल्या आहेत. त्यांनी कथा या साहित्यप्रकाराचा बहुजन समाजाचे धार्मिक प्रबोधन आणि सत्यशोधक विचारांचा प्रसार करण्यासाठी प्रभावी माध्यम म्हणून वापरले.

मुकुंदराव पाटील यांनी कथा हा केवळ मनोरंजनाचा प्रकार म्हणून स्वीकारलेला नाही, तर समाजप्रबोधनाचे प्रभावी साधन म्हणून त्याचा उपयोग केला. सामान्य ग्रामीण माणसाला गोष्ट ऐकण्याची आवड असल्याचे लक्षात घेऊन त्यांनी 'गोष्ट' आणि 'मनोरंजक गोष्ट' या शीर्षकांखाली धर्मातील अंधश्रद्धा, कर्मकांड, बुवाबाजी, पुरोहितशाही, शोषण आणि सामाजिक विषमता यांचे वास्तववादी चित्रण केले. त्यांच्या कथांमध्ये सत्यशोधक समाजाच्या समता, विवेक, विज्ञाननिष्ठा आणि मानवतावादी धर्मदृष्टीचा प्रभाव स्पष्टपणे दिसून येतो.

**६.३.२ कादंबरी-**

कादंबरी हा साहित्यप्रकार असला तरी तो केवळ मनोरंजनाचे माध्यम नसून समाजजीवन, संस्कृती, इतिहास, धर्म, राजकारण

आणि मानवी मूल्यांचे प्रतिबिंब दाखविणारा प्रभावी वाङ्मयप्रकार आहे. कोणत्याही समाजाच्या धार्मिक संकल्पना, श्रद्धा-अंधश्रद्धा, नैतिक मूल्ये, सामाजिक विषमता, धार्मिक संघर्ष, सुधारणा आणि मानवतावादी विचार यांचे वास्तववादी चित्रण कादंबरीत आढळते. त्यामुळे दीनमित्र मधील धर्मविषयक चिंतनाचा अभ्यास करताना कादंबरी हे एक महत्त्वाचे साधन ठरते. दीनमित्रची इ.स. १८८८ मध्ये स्थापना झाल्यावर गणपतराव पाटील यांच्या संपादनात 'दीनमित्र' मधून 'बळीबा पाटील' कादंबरी भालेकृत कादंबरी यानावाने क्रमशः प्रकाशित झाली. पुढे १९१० ते १९२९ याकालावधीत मुकुंदराव पाटील यांनी 'होळीची पोळी', 'चंद्रलोकीची विलक्षण रूढी अथवा आमच्या दादासाहेबांची फजिती', 'ढड्डाशास्त्री परान्ने', 'तोबा तोबा' आणि 'राष्ट्रीय तारुण्य' अशा पाच कादंबऱ्या लिहिल्या. यांपैकी चार पूर्ण असून राष्ट्रीय तारुण्य अपूर्ण राहिली. या सर्व कादंबऱ्या प्रथम दीनमित्र साप्ताहिकातून क्रमशः प्रसिद्ध झाल्या. त्यामुळे हे कादंबरीलेखन सत्यशोधक चळवळीच्या प्रचाराचे आणि सामाजिक प्रबोधनाचे प्रभावी माध्यम ठरले. या कादंबऱ्यांचे सर्वात मोठे वैशिष्ट्य म्हणजे कला आणि समाजप्रबोधन यांचा समन्वय. त्यांनी मनोरंजनासाठी कादंबरी लिहिली नाही; तर समाजातील अंधश्रद्धा, जातिभेद, धार्मिक कर्मकांड, स्त्रीदास्य, खोटी प्रतिष्ठा, सांप्रदायिकता आणि ग्रामीण मागासलेपण यांवर प्रहार करण्यासाठी कादंबरीचा वापर केला. त्यामुळे त्यांच्या कादंबऱ्यांत सत्यशोधक विचारधारा प्रकर्षाने दिसून येते.

**६.४ दीनमित्रमधील धर्मविषयक कविता - लावणी, पोवाडे, अभंग, स्पुट कविता-**

**६.४.१ दीनमित्रमधील धर्मविषयक लावणी-**

**भालेकरकृत उपदेशपर लावण्या-** कृष्णराव भालेकरांनी पारंपरिक श्रृंगारप्रधान लावणीला समाजप्रबोधनाचे माध्यम बनविले. डफ-तुणतुण्याच्या तालावर लावणी ऐकण्यासाठी जमणाऱ्या सामान्य जनतेपर्यंत त्यांनी सामाजिक, धार्मिक आणि नैतिक विचार पोहोचविले. त्यांच्या लावण्यांतून शेतकऱ्यांचे प्रश्न, आर्थिक शोषण, धार्मिक दांभिकता, अंधश्रद्धा आणि सामाजिक विसंगती यांचे चित्रण आढळते.

'दुकानदार शेटजी' ही भालेकरांची लावणी दीनमित्र, मार्च १८८९ मध्ये प्रसिद्ध झाली. या लावणीत दुकानदारांकडून होणारी वजन-मापातील फसवणूक, निकृष्ट मालाची विक्री, खोटेपणा आणि धार्मिक दांभिकता यांवर भाष्य करण्यात आले आहे. दिवसा ग्राहकांची फसवणूक करून रात्री देवभक्ती करणाऱ्या शेटजींच्या दांभिक वृत्तीवर भालेकरांनी उपरोधिक भाष्य केले आहे.

"शेटजी निकृष्ट दर्जाचा माल चांगला म्हणून खपवितात. खोटे बोलतात व आपले पोट भरतात. वजन-मापात कमी जास्त करणे, घासाघीस करून माल कटविणे, सुटे पैसे देऊन बट्टा घशात घालणे असे प्रकार शेटजी लोक सर्रास करतात. यासंदर्भात त्यांच्याशी अधिक बोलू लागताच ते "ज्ञानोबाची वा विठोबाची शपथ" घेतात, त्यांचा माल खराब निघाला म्हणून परत दिला तर शिव्या देऊ लागतात. दिवसा धंदा, लबाडी करून रात्री देवाच्या भजनात सामील होतात, असे करताना त्यांना थोडीही लाज वाटत नाही. अशा निर्दय, पाजी, हरामी, लफंग्या शेटजीपासून आपण सावधपणे दूर राहावे, असे भालेकर सुचवितात." (७९'दीनबंधु' कृष्णराव भालेकर) "दीनमित्रच्या डिसेंबर १८८८ ते मार्च १८८९. कालावधीत लावणीतून मुहूर्त, पंचांग, शुभ वेळ यांसारख्या अंधश्रद्धांवर भालेकरांनी कडक टीका केली आहे. वेळ मुहूर्त पाहता विघ्न टाळीता आकाशा। भटजी बोडक्या होती कैशा? (दीनमित्र, डिसेंबर १८८८ ते मार्च १८८९). यांसारखे व्यावहारिक दाखले देऊन मुहूर्ताचे फोलपण दाखवून दिले आहे."

**गणपतराव पाटील यांच्या लावण्या-**

"'दीनमित्र'चे पहिले संपादक गणपतराव पाटील यांनी दीनमित्रच्या, जुलै १८८९ अंकात 'ऐका ऐका धूर्त बुवा' या लावणीतून मृत व्यक्तीच्या पिंडदानाच्या वेळेस ब्राह्मणांना दान दिले जाते. या विधीतील फोलपणा सांगितला आहे. धार्मिक विधींच्या नावाखाली ब्राह्मण लोकांना कसे लुबाडतात, हे या पदातून कवीने दाखवून दिले आहे. 'ऐका ऐका धूर्त बुवा' या रचनेतून धार्मिक विधींच्या माध्यमातून सामान्य लोकांकडून पैसा उकळण्याच्या प्रवृत्तीवर त्यांनी टीका केली. त्यामुळे त्यांची धार्मिक चिकित्सा ही केवळ श्रद्धाविरोधी नव्हती; उलट धर्माच्या नावाखाली निर्माण झालेल्या शोषणकारी सामाजिक व्यवस्थेचा विरोध करणारी होती." (अरुण शिंदे,सत्यशोधकीय नियतकालिके, कृष्णा संशोधन व विकास अकादमी सोलापूर द्वितीय आवृत्ती २८ नोव्हेंबर २०१९ पृ.३९९)

**६.४ .२ पोवाडे** –

सत्यशोधक परंपरेनेही या लोकाभिमुख साहित्यप्रकाराचा उपयोग समाजातील अंधश्रद्धा, जातिभेद, कर्मकांड आणि धार्मिक विषमता यांवर प्रहार करण्यासाठी केला. महात्मा जोतीराव फुले यांनी सत्यशोधक विचारांचा प्रचार व प्रसार करण्यासाठी पोवाड्याचा उपयोगकेला.तीच परंपरा पुढे 'दीनमित्र' या सत्यशोधक विचारसरणीच्या मुखपत्रातून झाली. कृष्णराव भालेकरांचे एकूण सात पोवाडे असून अनेक पोवाडे दीनमित्रमधून प्रकाशित झाले.प्रस्तुत संशोधन अभ्यासाठी दीनमित्र मासिकातून १८८८ ते१८९२ या कालावधीत प्रकशित होणाऱ्या धर्मविषयक पोवाडे यांचा अभ्यास करण्यात आला आहे. **"अनार्याचे गाऱ्हाणे" हा भालेकरांचा पोवाडा**" (दीनमित्र, व. १, अं. ६, सप्टेंबर १८८८, पृ. १२१ ते १२४) गाऱ्हाणे मांडणारा, तक्रार सांगणारा आहे. एका अनार्याने आर्याविरुद्ध म्हणजे एका शूद्राने अशूद्राविरुद्ध अर्थात एका अस्पृश्याने स्पृश्याविरुद्ध या पोवाड्यात तक्रार केलेली आहे. "वरील "पोवाड्या" शिवाय भालेकरांनी "कलगीतुरा, शिवशक्ती, द्वैताद्वैत वगैरे विषयांवर वादविवाद कारणारास विनंती" करणारा आणखी एक पोवाडा लिहिलेला आहे." (दीनमित्र, व. १, अं. ७, ऑक्टोबर १८८८).

या पोवाड्यांमध्ये धर्माची चिकित्सक मांडणी, समता, मानवता, विवेक, सामाजिक न्याय आणि सत्याधिष्ठित आचरण यांचा सातत्याने पुरस्कार करण्यात आला. या पोवाड्यांमध्ये धर्माचा अर्थ केवळ कर्मकांड, रूढी आणि धार्मिक विधी एवढाच मर्यादित न ठेवता तो मानवी कल्याण, नैतिक मूल्ये आणि सामाजिक समतेशी जोडण्याचा प्रयत्न दिसून येतो. त्यामुळे हे पोवाडे धार्मिक विचारांच्या पुनर्मूल्यांकनाचे आणि समाजप्रबोधनाचे प्रभावी साधन ठरतात.

दीनमित्र मधून प्रकाशित होणारे "भालेकरांचे पोवाडे बोधपर व चटकदार आहेत. पोवाड्यांमध्ये आढळणारा वीररस भालेकरांच्या पोवाड्यात नाही, पण इतर काव्यगुण मात्र भरपूर आहेत. श्राव्यगुण तर या पोवाड्यांमध्ये नक्कीच आहे, म्हणूनच प्रसिद्ध अमेरिकन लेखिका डॉ. गेल ऑमवेत यांनी "Pavada and Padya (verses), These were published in newspapers and often sung at meetings or religious ceremones' असे जे भालेकरांच्या पोवाड्याविषयी म्हटले आहे."

**६.४.३ दीनमित्रमधील धर्मविषयक अभंग -**

**गणपतराव पाटील यांचे अभंग-**

दीनमित्र' चे पहिले संपादक गणपतराव पाटील हे उत्तम लेखक व कवी होते. 'दीनमित्र' या टोपणनावाने त्यांनी काव्यलेखन

केले. हिंदू धर्मात अनेक देवदेवता आहेत आणि त्यांच्या उपासनेच्या अनेक पद्धती आहेत. त्यामुळे भोळ्या आणि अज्ञानी शेतकऱ्यांना कोणत्या देवाची पूजा करावी आणि ती कशी करावी, याबाबत संभ्रम निर्माण होतो. देवधर्माच्या नावाखाली त्यांची अनेकदा फसवणूक केली जाते. शेतकऱ्यांच्या या संभ्रमित अवस्थेचे वर्णन गणपतराव पाटील यांनी 'शेतकऱ्यांकरिता भजन' या अभंगातून केले आहे (दीनमित्र, ऑक्टोबर १८९२

**सत्यशोधक ज्ञानगिरी महाराजांचे अभंग-**

दिवंगत महंत ज्ञानगिरी हे औरंगाबाद जिल्हा, गंगापूर तालुका, मौजे नेऊरगाव येथील गोसावी होते. हे सत्यशोधक समाजाचे निष्ठावंत अनुयायी. यांनी समाजासाठी ४५ वर्षांपूर्वी फार श्रम घेतले. ज्ञानगिरी महाराजांचे बहुतांश अभंग सोमठाणे येथूनच दीनमित्रमधून प्रकाशित झाले आहे. दीनमित्र या सत्यशोधकीय पत्रावर ज्ञानगिरीबुवांचे असीम प्रेम होते. हे त्यांचे निर्व्याज प्रेम दोन अभंगातून व्यक्त झालेच आहे. सत्यशोधक समाजाच्या ध्येयानुसार, आचरणानुसार ज्ञानगिरीबुवांची प्रस्तुत अभंगमाला प्रस्तुत झाली आहे. या अभंगमालेचे सत्यशोधकीय मोल जाणून, सत्यशोधकीय संपादक 'दीनमित्र'कार मुकुंदराव पाटील यांनी ती प्रकाशित केली. दीनमित्र'मधून प्रसिद्ध झालेले ज्ञानगिरी महाराजांचे अभंगांतून धार्मिक क्षेत्रातील बुवाबाजी, भोंदू साधू, कर्मकांड, तीर्थक्षेत्रांवरील लूटमार, धर्माच्या नावाखाली होणारे आर्थिक शोषण, दांभिकपणा आणि अंधश्रद्धा यांवर परखड टीका करण्यात आली आहे.

**६.५ धर्मविषयक स्पुट कविता-**

दीनमित्र या सत्यशोधकीय नियतकालिकामध्ये रामचंद्र जाधव ऊर्फ दासराम, कवी जयगोविंद ऊर्फ शामादास, कवी शिवाजीराव, कवीगणपत, मुरलीधर आबाजी क्षीरसागर आदी विविध कवींनी धर्मविषयक स्फुट कविता लिहिल्या आहेत. या कवितांमधून तत्कालीन धार्मिक जीवनातील अनेक प्रश्न मांडले गेले आहेत. धर्मसंस्था, धर्मग्रंथ, चातुर्वर्ण्य व्यवस्था, जातिभेद, ब्राह्मणांची मध्यस्थी, भोंदू साधू, बुवा, भटजी, कर्मकांड आणि धार्मिक अंधश्रद्धा या विषयांवर या सत्यशोधक कवींनी टीका केली आहे. त्यांच्या कवितांचा उद्देश केवळ धार्मिक व्यवस्थेवर टीका करणे हा नव्हता, तर सामान्य लोकांना आपल्या धार्मिक आचरणाचा विचार करण्यास प्रवृत्त करणे हा होता.

**१.रामचंद्र जाधव ऊर्फ दासराम-**

कवी जयगोविंद उर्फ शामादास यांनी ढोंगी गुरूची दांभिकता उघडी पाडून त्यांचा त्याग करण्याचे व देवालाच गुरू मानण्याचे आवाहन केले आहे. १४ जानेवारी १९१५रोजीच्या दीनमित्रमधील अभंगामधून धर्माच्या नावाखाली पोट भरणाऱ्या पाखंडी व्यक्तींचा त्यांनी खरपूस समाचार घेतला आहे.

**२.जयगोविंद ऊर्फ शामादास-**

देवाची भक्ती करताना मध्यस्थांची जरुरी नाही, हे सत्यशोधक समाजाचे तत्त्व होते. ब्राह्मण, भटजी, गुरू, बुवा, साधू, पुजारी इत्यादी मंडळी देव व भक्त यांच्यामध्ये मध्यस्थांचे काम करतात .कवीजयगोविंद ऊर्फ शामादास यांनी दीनमित्राच्या ३ मे १९१६. रोजीच्या"ढोंगी गुरूचा त्याग करा" अभंगातून मध्यस्थ यांच्यावर कडाडून टीका करून मध्यस्थांच्या समूळ उच्चाटनाची भूमिका मांडली.

**३. कवी मुरलीधर आबाजी क्षीरसागर-**

दीनमित्राच्या ३ जुलै १९२९ व १४ ऑगस्ट १९२९" रोजीच्या उपदेशपर पद " याअभंगातून मध्यस्थ नाकारत पितृतिथीला ब्राह्मणांना पितर मानून त्यांची पूजा करून भोजन व दक्षिणा देण्याच्या प्रथेला मुरलीधर आबाजी क्षीरसागर यांनी विरोध केला आहे. आपले पूर्वज व आपण यांच्यामध्ये ब्राह्मणांची मध्यस्थी नाकारली.

**४. कवी गणपत-**

२१ मे १९१९ रोजीच्या दीनमित्रमधील अभंगामधून, 'कवी गणपत' यांनी तुकारामांच्याप्रमाणे ते ढोंगी गुरू, बुवाबाजीवर भोंदू साधूंच्यावर तुटून पडतात. अभंगामधून धर्माच्या क्षेत्रातील भ्रष्ट व दांभिक प्रवृत्तींच्या उच्चाटनासाठी शब्दांची धारदार शस्त्रे उपयोगात आणतात.

**५. कवी शिवाजीराव -**

दीनमित्रच्या दि. २७ ऑक्टोबर १९१५ व दीनमित्र, १५ सप्टेंबर १९१५ रोजीच्या प्रकाशित अभंगातून कवी शिवाजीराव यांनी जाति व्यवस्था व जातिभेद यांची चिकित्सा केली. हिंदू धर्मातील जन्माधिष्ठित जातिव्यवस्था व उच्चनीचता यांचे निर्मूलन आणि सामाजिक समतेचा पुरस्कार विचार मांडले.

**६.६ प्रबोधनपर संवाद-**

दीनमित्रमधून मुकुंदराव पाटील यांनी 'बोका आणि सत्यनारायण', (दीनमित्र, ३ एप्रिल १९२१)'शिष्य आणि गुरू', (दीनमित्र, २७ एप्रिल १९२१). 'चांदोबा आणि यात्रेकरू'(दीनमित्र, ४ मे १९२१), 'मुंगळा आणि वारकरी'(दीनमित्र, १४ मार्च १९२३)., 'भूत आणि कोंबडा (दीनमित्र, २८ मार्च १९२३). 'महार व सोवळा' (दीनमित्र, १९ ऑक्टोबर १९२१) ', 'शेताच्या राखणाचा मंत्र' (दीनमित्र, ७ ऑक्टोबर १९२५). आणि 'मनोरंजक संवाद'(दीनमित्र, २२ जुलै १९२५). यांसारख्या संवादांतून धर्मातील अविवेकी आचारांवर उपरोधिक शैलीत टीका केली आहे. सत्यनारायणाच्या कथेतील विसंगती, श्राद्धविधीतील निरर्थकता, वारकरी संप्रदायातील कर्मकांड, भुतांवरील अंधश्रद्धा, मंत्रतंत्र आणि ज्योतिषावरील अंधविश्वास यांचे खंडन करून त्यांनी धर्माचा पाया विवेक, नैतिकता आणि सामाजिक उपयुक्तता यांवर असावा, अशी भूमिका मांडली. यासह "दीनमित्रमधून (दीनमित्र, २३ जानेवारी व ३० जानेवारी १९२९),कृ. क. चौधरी यांनी 'भाग्यवान सुशिला अथवा विवाहविषयक सत्यशोधकी मार्ग' या संवादामध्ये विधवा पुनर्विवाह व सत्यशोधकीय विवाह पद्धतीचा पुरस्कार केला आहे." (४८४ -४८५। सत्यशोधकीय नियतकालिके) कृष्णराव भालेकरांनी शास्त्रपुराणादी ग्रंथांचे कालबाह्यत्व 'शास्त्राधार' या संवादामध्ये मांडले आहे (दीनमित्र, २२ जून १९२२, २५ जुलै १९२२). यासह"गुंड्युत मुंजाबा यांच्या 'पिंपळाचा पार' या संवादामध्ये क्षात्रजगद्गुरुपीठास विरोध केला आहे. (दीनमित्र, २ ऑगस्ट व ९ ऑगस्ट १९२२)". (४८४। सत्यशोधकीय नियतकालिके) या संवादांचे लेखन समाजप्रबोधनासाठी झाले आहे.

**६.७ सुबोध वचने-**

दीनमित्रमधून दीनमित्रकार मुकुंदराव पाटील यांनी बहुजन समाजाचे धार्मिक प्रबोधन करण्यासाठी "सुबोध वचने" ही केवळ नैतिक उपदेशात्मक वाक्ये श्रीतोष या टोपण नावाने लिहिली आहे. दीनमित्रमधील "सुबोध वचने" ही केवळ नैतिक उपदेशात्मक

वाक्ये नसून सत्यशोधक विचारधारेतील धर्म, मानवता, विवेक, अनुभव आणि सामाजिक समतेची मूल्यव्यवस्था व्यक्त करणारे चिंतन आहे. या वचनांमध्ये धर्माची नव्याने व्याख्या करताना अंधश्रद्धा, जातिभेद, दुराग्रह आणि संकुचित धार्मिक अभिमान यांवर कठोर टीका करण्यात आलेली आहे.

**६.८ दीनमित्रमधील पत्रव्यवहार-**

दीनमित्र' सत्यशोधकी विचारांचे साप्ताहिक वृत्तपत्र होते. यावृत्तपत्राने  महात्मा फुले आणि सत्यशोधक विचार सामान्य शेतकरी, बहुजन आणि वंचित समाजापर्यंत पोहोचवण्याचे काम केले. 'दीनमित्र'मध्ये अग्रलेख, लेख, कविता, कथा, कादंबऱ्या, नाटके इत्यादी साहित्य प्रसिद्ध होत होते. त्याचबरोबर 'पत्रव्यवहार' हे एक महत्त्वाचे सदर होते. या सदरातून सामान्य लोक, शेतकरी, सत्यशोधक कार्यकर्ते आणि विविध समाजघटक आपले प्रश्न आणि अनुभव मांडत होते. या सदरातून सामान्य लोक, शेतकरी, सत्यशोधक कार्यकर्ते आणि विविध जाती-जमातींचे प्रतिनिधी आपले सामाजिक, धार्मिक, शैक्षणिक, आर्थिक आणि सांस्कृतिक प्रश्न मांडत होते. त्यामुळे 'दीनमित्र'मधील पत्रव्यवहार हा तत्कालीन समाजजीवनाचा एक महत्त्वाचा आरसा ठरतो.  दीनमित्र' मधील पत्रव्यवहार हे केवळ वाचकांची पत्रे नव्हती. या पत्रांमधून तत्कालीन समाजातील प्रत्यक्ष परिस्थिती समोर येत होती. या पत्रव्यवहाराचे आणखी एक महत्त्वाचे वैशिष्ट्य म्हणजे सामान्य लोकांची भाषा आणि त्यांचे प्रत्यक्ष अनुभव यांना 'दीनमित्र'मध्ये स्थान मिळाले. पत्रव्यवहारामधून पुढील विषय आढळतात सामाजिक प्रश्न धार्मिक प्रश्न, शैक्षणिक प्रश्न, शेतकऱ्यांचे प्रश्न, आर्थिक अडचणी, जातिभेद अस्पृश्यता, विवाहपद्धती, धार्मिक कर्मकांड, पुरोहितशाही,अंधश्रद्धा सामाजिक सुधारणा. 'भटाच्या उलट्या थापा', 'निर्दयतेची कमाल', 'शेतकऱ्याची यंदाची स्थिती' यांसारख्या शीर्षकांमधून त्या काळातील सामाजिक आणि धार्मिक प्रश्नांवर केलेली टीका दिसून येते. विशेषतः धर्माच्या संदर्भात या पत्रांमधून अंधश्रद्धा, धर्मभोळेपणा, चुकीची कर्मकांडे, पुरोहितांचे वर्चस्व, धार्मिक मध्यस्थी, जातिभेद आणि धर्माच्या नावाने होणारे शोषण यांवर टीका करण्यात आली. त्याच वेळी सत्य, विवेक, मानवता, समता, शिक्षण आणि सामाजिक न्याय यांवर आधारित सत्यशोधकीय धर्मदृष्टी मांडण्यात आली.

**७. निष्कर्ष (Conclusion)-**

'दीनमित्रमधील धर्मविषयक लेखन साहित्य : एक अभ्यास' या अभ्यासातून असे स्पष्ट होते की, 'दीनमित्र' हे केवळ वृत्तपत्र नसून सत्यशोधक विचारधारेच्या प्रसाराचे आणि बहुजन समाजाच्या धार्मिक व सामाजिक प्रबोधनाचे प्रभावी माध्यम होते. या पत्रातील अग्रलेख, संकीर्ण लेख, कथा, कादंबऱ्या, कविता, लावण्या, पोवाडे, अभंग, स्फुट कविता, प्रबोधनपर संवाद, सुबोध वचने आणि पत्रव्यवहार अशा विविध साहित्यप्रकारांतून धर्मविषयक चिंतनाची व्यापकता दिसून येते.

'दीनमित्र'मधील धर्मविषयक लेखनाची प्रमुख वैशिष्ट्ये म्हणजे विवेकवाद, तर्कनिष्ठता, मानवतावाद, सामाजिक समता आणि धार्मिक सुधारणेची भूमिका होय. धर्माच्या नावाखाली चालणारे कर्मकांड, अंधश्रद्धा, बुवाबाजी, पुरोहितशाही, धार्मिक मध्यस्थी, जातिभेद आणि आर्थिक शोषण यांवर या साहित्यामधून चिकित्सक व उपरोधिक पद्धतीने प्रहार करण्यात आला. मात्र या लेखनाचा उद्देश धर्मविरोध करणे नसून धर्माच्या नावाने निर्माण झालेल्या शोषणकारी रूढी व विषमतेला विरोध करणे हा होता.

कथा, कादंबरी, लावणी, पोवाडे आणि अभंग यांसारख्या लोकाभिमुख साहित्यप्रकारांचा उपयोग सामान्य व ग्रामीण

समाजापर्यंत सत्यशोधक विचार पोहोचविण्यासाठी करण्यात आला. त्यामुळे 'दीनमित्र'मधील धर्मविषयक साहित्य हे केवळ वैचारिक स्वरूपाचे न राहता लोकशिक्षण आणि समाजप्रबोधनाचे प्रभावी साधन बनले. स्त्री-पुरुष समानता, अस्पृश्यता निर्मूलन, सत्यशोधकीय विवाह, शिक्षण, स्वाभिमान आणि सामाजिक न्याय यांसारख्या मूल्यांना या साहित्याने प्रोत्साहन दिले.

विशेषतः मुकुंदराव पाटील, कृष्णराव भालेकर, गणपतराव पाटील, ज्ञानगिरी महाराज तसेच विविध सत्यशोधक लेखक-कवींनी आपल्या लेखनातून धर्माचे मानवी, नैतिक आणि विवेकाधिष्ठित स्वरूप अधोरेखित केले. 'पत्रव्यवहार' या सदरातून सामान्य जनतेचे धार्मिक व सामाजिक अनुभव व्यक्त झाल्यामुळे 'दीनमित्र'चे धर्मविषयक लेखन तत्कालीन समाजजीवनाचे वास्तव प्रतिबिंब ठरते.

एकूणच, 'दीनमित्र'मधील धर्मविषयक साहित्याने परंपरागत कर्मकांडप्रधान धर्मदृष्टीऐवजी सत्य, समता, विवेक, मानवता आणि नैतिक आचरणावर आधारित धर्मदृष्टीची मांडणी केली. त्यामुळे मराठीतील सत्यशोधक साहित्यपरंपरेत 'दीनमित्र'चे धर्मविषयक लेखन महत्त्वपूर्ण ठरते. या साहित्याचा अभ्यास केल्यास सत्यशोधक चळवळीने धार्मिक सुधारणेला सामाजिक परिवर्तनाशी जोडून बहुजन समाजाच्या वैचारिक मुक्तीची प्रक्रिया कशी गतिमान केली, हे स्पष्टपणे दिसून येते.

**८. संदर्भसूची (References:)-**


१.दीनमित्र, व. १, अं. ६, सप्टेंबर १८८८, पृ. १२१ ते १२४.

२. दीनमित्र, व. १, अं. ७, ऑक्टोबर १८८८.

३. डॉ भाऊसाहेब खांदवे, दीनबंधु' कृष्णराव भालेकर पृ. ७४'

४.दीनमित्र सिल्व्हर ज्युबिली अंक, १९३८, पृ. २

५. अरुण शिंदे,सत्यशोधकीय नियतकालिके ,कृष्णा संशोधन व विकास अकादमी सोलापूर द्वितीय आवृत्ती २८ नोव्हेंबर २०१९पृ. ४८४ -४८५

६. अरुण शिंदे, सत्यशोधकीय नियतकालिके, कृष्णा संशोधन व विकास अकादमी सोलापूर द्वितीय आवृत्ती २८ नोव्हेंबर २०१९ पृ.३९६)

७ अरुण शिंदे, सत्यशोधकीय नियतकालिके, कृष्णा संशोधन व विकास अकादमी सोलापूर द्वितीय आवृत्ती २८ नोव्हेंबर २०१९ पृ.३९९.